# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२

आदेश क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२३/का.५,

दिनांक- ११ डिसेंबर, २०११

## आदेश

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए मधील तरतुदीन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादया तयार करण्याच्या कामाचे अधिक्षण, संचालन आणि नियंत्रण आणि अशा निवडणुकांचे आयोजन करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्यापूर्वी या संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. मात्र ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचारी वृंदाची सेवा अधिग्रहित करण्याबाबतच्या तरतुदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमांमध्ये करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन दिनांक २ मार्च, १९९५ च्या आदेशान्वये कर्मचा-यांच्या सेवा, निवडणुकीसाठी लागणा-या इमारती / जागा, वाहने अधिग्रहित करण्यासाठी आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशामध्ये कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहित करण्यासंदर्भातील तरतूद थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी व इतर निवडणुकांच्या बाबतीत जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी विनंती केल्यानंतर राज्य शासनाचे विभाग / कार्यालय, स्थानिक प्राधिकरण, राज्य शासनाच्या मालकीचे अथवा नियंत्रणाखाली असलेली महामंडळे किंवा राज्य शासनाची कंपनी किंवा सब्सीडीअरी कंपनीकडून निवडणुकीच्या कामासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वृंद उपलब्ध करुन दिला जाईल.

आदेशामध्ये पुढे अशीही तरतूद आहे की, उपरोक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास एक वर्षाच्या कालावधीपर्यंत कैदेची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा दिली जाईल.

२. राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त आदेशातील तरतुदी स्पष्ट आहेत. निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आलेले अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व इतर कर्मचारी हे कोणत्याही कारणास्तव कामावर येत नसले किंवा कार्यालयात अनुपस्थित राहण्यास त्यांना परवानगी देण्यात आली असली तरीदेखील निवडणुकीच्या कामाच्या संदर्भात त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी त्यांनी पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. तसेच ही जबाबदारी पार पाडण्यात त्यांनी दिरंगाई अथवा जाणीवपूर्वक टाळाटाळ केली असता ते उपरोक्त आदेशानुसार शिक्षेस पात्र ठरतात. या व्यतिरिक्त त्यांच्याविरुध्द विभागीय कार्यवाहीही करण्यात येऊ शकते.

३. राज्य शासकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या विविध संघटनांनी दिनांक १४ डिसेंबर, २०११ पासून बेमुदत संपावर जाण्याची नोटीस शासनास दिलेली आहे. आगामी काळात संपूर्ण राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. सध्या राज्यातील १९५ नगरपरिषद निवडणुकांची प्रक्रिया सुरु आहे. या निवडणुकांच्या कामासाठी मोठया प्रमाणावर अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत किंवा येणार आहेत. वर नमूद केलेल्या परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी कोणतीही सबब न सांगता पार पाडणे आवश्यक आहे. या जबाबदारीतून त्यांना रजा, संप, इ. कोणत्याही कारणास्तव सूट दिली जाणार नाही. तसेच निवडणुकीच्या कामाची जबाबदारी पार पाडण्यात टाळाटाळ करणारे अधिकारी व कर्मचारी वर नमूद केल्याप्रमाणे फौजदारी व विभागीय कार्यवाही करण्यास पात्र ठरतील. या आदेशाची समज सर्व संबंधितांना करुन देण्यात यावी.

नीला सत्यनारायण

( नीला सत्यनारायण ) ११/१२/११

राज्य निवडणूक आयुक्त,

महाराष्ट्र

प्रति :- सर्व जिल्हाधिकारी

सर्व महानगरपालिका आयुक्त

D:\Rashmi\SEC order to all mnc com & coll.doc